महाराष्ट्र शासन
परिवहन आयुक्त कार्यालय
५ वा मजला, टेलिकॉम बिल्डींग नं २,
महात्मा गांधी रोड, फाऊंटन, मुंबई ४०० ००१.

दुरध्वनी क्रमांक ०२२-२०८२७१०३ Email ID - dycommr.inspect@gmail.com

क्र. कार्या-१०/पआका/दुरुस्ती/निरीक्षण/०५(२३)जा.क्र. 11296 दिनांक :- 8 OCT 2024

# प्रसिध्दीपत्रक

## परिवहन आयुक्त कार्यालयातील जलशुध्दीकरण यंत्र (WATER PURIFIER) सुस्थितीत ठेवण्यासाठी सर्वसमावेशक वार्षिक देखभाल दुरुस्ती करार करणेबावत.

परिवहन आयुक्त कार्यालयातील एकुण ३ जलशुध्दीकरण यंत्र (WATER PURIFIER) सुस्थितीत ठेवण्यासाठी इच्छूक सेवापुरवठादारामार्फत **सर्वसमावेशक वार्षिक देखभाल दुरुस्ती करार पध्दतीने (COMPREHENSIVE ANNUAL MAINTENANCE CONTRACT)** करार करण्याकरिता बंद लिफाफ्यात दरपत्रक मागविण्यात येत आहे. इच्छुक सेवा पुरवठादारांस कळविण्यात येत आहे की, या कार्यालयातील जलशुध्दीकरण यंत्र (WATER PURIFIER) सुस्थितीत ठेवण्याचे कामकाज सर्वसमावेशक वार्षिक देखभाल दुरुस्ती करार पध्दतीने करण्यासाठी विभागाच्या https://transport.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्दीपत्रक प्रदर्शित करण्यात येणार आहे.

जलशुध्दीकरण यंत्राच्या (WATER PURIFIER) सर्वसमावेशक वार्षिक देखभाल दुरुस्तीच्या कराराच्या **(COMPREHENSIVE ANNUAL MAINTENANCE CONTRACT) अटी व शर्ती** खालीलप्रमाणे आहे.

१. परिवहन आयुक्त कार्यालयातील ३ वॉटर प्युरिफायर (WATER PURIFIER) सुस्थितीत ठेवण्याकरिता नामांकित/ नोंदणीकृत कंपनी/ संस्थेकडून बंद लिफाफ्यात दरपत्रक मागविण्यात येत आहे. त्याचा तपशील पूढीलप्रमाणे आहे.

| Product | Make | Model | Quantity |
|---|---|---|---|
| REVERSE OSMOSIS (RO) WATER PURIFIER | Hi-Tech | १०० LPH | ३ |

२. इच्छूक सेवा पुरवटादार यांनी आपले बंद लिफाफ्यातील दरपत्रक कंपनी/ संस्थेच्या नाव, पत्ता व इतर संपूर्ण तपशीलासह **"जलशुध्दीकरण यंत्राच्या (WATER PURIFIER) सर्वसमावेशक वार्षिक देखभाल दुरुस्ती करार करणेवावत"** हे शिर्षक नमूद करून सदरचे दरपत्रक मा. सह परिवहन आयुक्त (निरीक्षण), परिवहन आयुक्त कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे नावे **फाऊंटेन टेलिकॉम भवन -२, ५ वा मजला, महात्मा गांधी रोड, फाऊंटेन, मुंबई - ४०० ००१** येथे **दिनांक १८/१०/२०२४, दिवस : शुक्रवार, संध्याकाळी ०५.०० वाजेपर्यंत** (शासकीय सुट्टया वगळून) प्रत्यक्ष जमा करावे किंवा टपालाव्दारे पाठवावे. दरपत्रक टपालाव्दारे पाठविण्यात येत असतील तर सदर दरपत्रक वरील दिनांकापर्यंत या कार्यालयास प्राप्त होतील अशा प्रकारे पाठविण्यात यावीत. मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही. तसेच दरपत्रक मंजूर अथवा नामंजूर करण्याचे सर्व अधिकार या कार्यालयाकडे राहतील याची नोंद घेण्यात यावी.

Scanned with OKEN Scanner

३. दरपत्रकातील शर्तीनुसार निवडण्यात आलेल्या सेवापुरवठादारास दरपत्रकात सुचविलेल्या दराच्या **एकूण वार्षिक रकमेच्या ३ टक्के किंवा कमाल रु. १०,०००/- इतकी अनामत रक्कम** सुरक्षा ठेव म्हणून करारनाम्यासह या कार्यालयास सादर करावी लागेल. त्यावर कोणत्याही प्रकारचे व्याज दिले जाणार नाही.

४. सेवा पुरवठारास यापुर्वी शासकीय कार्यालये / संस्था/ स्थानिक स्वराज्य संस्था / महानगरपालिका / सार्वजनिक उपक्रम इत्यादी कार्यालयात देण्यात आलेल्या सेवेमध्ये अपयश आल्यामूळे किंवा अन्य कारणामूळे काळ्या यादीत टाकण्यात आल्याचे निदर्शनास आल्यास सदरची सेवा तात्काळ समाप्त करण्यात येईल.

५. निवडलेल्या सेवा पुरवठादारास करारामध्ये नमूद केलेल्या सर्व जलशुध्दीकरण यंत्राच्या (WATER PURIFIER) सर्वसमावेशक वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे अनिवार्य असेल. कामाची व्याप्ती पुढीलप्रमाणे आहे :-

अ) कराराच्या कालावधीमध्ये सेवापुरवठादारास कमीत कमी १२ भेटी (मासिक) तसेच आवश्यकतेनुसार जेव्हा गरज पडेल तेव्हा कार्यालयास सदरच्या देखभाल दुरुस्ती साठी भेटी देणे अनिवार्य असेल.

ब) यंत्रात बिघाड झाल्यास अथवा कर्मचाऱ्यांनी यंत्राबाबत कूटलीही तक्रार केल्यास किंवा यंत्रातील उपकरणात कूठल्याही प्रकारची बिघाड झाल्यास सेवापुरवठादारास २ दिवसाच्या आत यंत्रातील दोष दुरुस्त करून देणे अनिवार्य असेल.

क) सेवापुरवठादारास दर महिन्याला जलशुध्दीकरण यंत्रांची (WATER PURIFIER) युनिट तपासणी तसेच त्याची सामान्य साफसफाई करणे अनिवार्य असेल.

ड) सेवापुरवठारास आवश्यकतेनुसार जलशुध्दीकरण यंत्रांची (WATER PURIFIER) रासायनिक साफसफाई करणे तसेच त्याचे Membrane ची सजीवता (Life) संपूष्टात आल्यास त्याची बदली करणे अनिवार्य असेल.

इ) सदरचा करार हा प्रतिबंधात्मक तसेच देखभाल दुरुस्तीसाठी असल्यामूळे कराराच्या कालावधीत जलशुध्दीकरण यंत्रांच्या (WATER PURIFIER) खाली नमूद करण्यात आलेल्या भागांची दुरुस्ती आणि बदली विनामूल्य करून देणे सेवापुरवठादारास अनिवार्य असेल.

i) सर्व प्रकारचे फिल्टर (All kinds of filters)
ii) प्री-फिल्टर ऑफ कॅन्डल (Pre-filter of candle)
iii) कार्बन (Carbon)
iv) मेमब्रेन (Membrane)
v) एसएमपीएस/बॉलास्ट (SMPS/Ballast)
vi) पंप (Pump)
vii) कॉम्प्रेसर (Compressor)
viii) फॅन मोटार (Fan motor)
ix) अल्ट्रा-व्हाईलेट लॅम्प (Ultra-Violet Lamp)
x) थर्मोस्टॅट (Thermostat)
xi) रिलय (Relay)
xii) कपॅसिटर (Capacitor)
xiii) Outlet /Input pipe (आउटलेट / इन्पूट पाईप)
xiv) होज क्लिप्स (Hose clips)
xv) सेवापुरवठादारास उपरोक्त भागांव्यतिरिक्त इतर कुठल्याही भागांची मोफत सेवा पुरवावयाची असल्यास सेवापुरवठाराने त्याबाबत तसे **परिशिष्ट क** मध्ये नमूद करावे.

ई) कराराच्या कालावधीमध्ये सेवापुरवठादारास ईनलाईन कार्बन सेडिमेंट फिल्टर (कॅन्डल) (Inline Carbon sediment filter (candle) २ वेळा विनामूल्य बदलून देणे अनिवार्य असेल.

६. या कार्यालयामार्फत जलशुध्दीकरण यंत्रात (WATER PURIFIER) बिघाड झाल्याबाबतची तक्रार दुरध्वनीव्दारे सेवापुरवठादारास केली असता सेवापूरवठाराने तात्काळ सदर तक्रारीचे निराकरण करण्यासाठी कार्यालयात भेट देणे अनिवार्य असेल.

७. या कार्यालयात सदरचे काम करण्यासाठी निवडलेल्या कामगारास पाठविण्यापूर्वी संबंधित व्यक्तीची पोलिसांमार्फत चारित्र्य पडताळणी झालेली असणे अनिवार्य असेल.

Scanned with OKEN Scanner

८. कार्यालयामार्फत जर एखाद्या जलशुध्दीकरण यंत्राची (WATER PURIFIER) विल्हेवाट लावण्यात आली असेल किंवा एखादे जलशुध्दीकरण यंत्र (WATER PURIFIER) वापरात नसेल अशा वेळेस ज्या कालावधीपर्यंत सदर यंत्र उपयोगात असेल त्याच कालावधीपर्यंतचे देयक सेवापुरवठादारास अदा करण्यात येतील.

९. कराराच्या कालावधीत जलशुध्दीकरण यंत्राचे (WATER PURIFIER) काम करत असताना तसेच सदर यंत्राची पुनर्स्थापना करत असताना यंत्रामध्ये किंवा यंत्राच्या उपकरणात कूठल्याही प्रकारची हानी होणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक आहे. असे न झाल्यास यंत्रामध्ये कूठल्याही प्रकारची दुरुस्ती अथवा उपकरणांची बदली करण्याची गरज उद्भवल्यास सेवापुरवठादारास स्वत:च्या जबाबदारीने व स्व:खर्चाने सदर काम करावे लागेल.

१०. सेवापुरवठादाराने कामाच्या ठिकाणी सेवा पुरवित असताना सर्व नागरिकांची, कामगारांची व शासकीय मालमत्तेची हानी होणार नाही याची दक्षता घेऊन त्यादृष्टीने सर्व सुरक्षा उपायांची खात्री करूनच काम करणे अनिवार्य असेल.

११. सदरचा करार एका वर्षाच्या कालावधीसाठी वैध असेल. तथापि, कराराच्या कालावधीत सेवापुरवठादार समाधानकारक कामगिरी पुरविण्यास अपयशी ठरल्यास सदरचा करार कोणत्याही क्षणी समाप्त करण्याचे पूर्ण अधिकार परिवहन आयुक्त कार्यालय राखून ठेवत आहे.

१२. **सेवापुरवठादारास अदा करण्यात येणारे देयक हे त्रैमासिक असेल.** कराराच्या कालावधीमध्ये निवडलेल्या सेवापुरवठादारामार्फत समाधानकारक सेवा पुरविल्याची खात्री झाल्यास सेवापुरवठाराने तीन महिन्याच्या कालावधीचे देयक सादर केल्यानंतर सदर कामाचे देयक अदा करण्यात येईल.

१३. जर वाजवी वेळेत सेवापुरवठार सेवा पुरविण्यास अपयशी झाला आणि त्यादरम्यान तातडीची गरज म्हणून जलशुध्दीकरण यंत्राची (WATER PURIFIER) दुरुस्ती अन्य अधिकृत सेवापुरवठादाराकडून करून घेण्यात आली असेल अशा प्रसंगी होणाऱ्या खर्चाच्या रकमेची अदायगी सदर सेवापुरवठादारास करण्यात येईल आणि खर्च केलेल्या रकमेची वजावती निवडलेल्या सेवापुरवठादाराच्या त्रैमासिक देयकातून/ सुरक्षा अनामत रकमेतून कपात करण्यात येईल.

१४. सोबत जोडण्यात आलेल्या दरपत्रकाच्या विहित नमुन्यात **(परिशिष्ट अ, ब, व क)** सेवा पुरवठादाराने दरपत्रक सादर करणे बंधनकारक असेल. विहित नमुन्यात दरपत्रक प्राप्त न झाल्यास आपले दरपत्रक अपात्र ठरवण्यात येईल.

१५. ठेकेदाराने काम सुरु केल्यानंतर काम सोडावयाचे झाल्यास शासकीय कामकाजाचे किमान ४५ दिवस अगोदर कार्यालयस सूचना द्यावी लागेल.

१६. काम करत असताना सेवापुरवठादाराच्या कामगारास कोणतीही इजा / जखम झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची राहील. परिवहन आयुक्त कार्यालयाची कोणतीही जबाबदारी राहणार नाही.

१७. सेवापुरवठादारास शासकीय कार्यालयात **दोन वर्षांचा** जलशुध्दीकरण यंत्र (WATER PURIFIER) दुरुस्तीच्या **कामाचा अनुभव** असणे आवश्यक आहे. त्या अनुभवापृष्ठ्यर्थ संबंधीत संस्थेच्या प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.

१८. सेवापुरवठादारास स्वखर्चाने आवश्यक किंमतीच्या मुद्रांक कागदावर करारनामा करून द्यावा लागेल.

१९. प्राप्त झालेली दरपत्रके दिनांक २१/१०/२०२४ रोजी दुपारी ०४.०० वाजता हजर असणाऱ्या सेवापुरवठारा समक्ष परिवहन आयुक्त कार्यालय, मुंबई येथे उघडण्यात येतील. दरपत्रकाचे वाचन झाल्यावर नमुद केलेल्या दरात कोणतेही फेरफार मान्य केले जाणार नाहीत. तसेच कारण न देता कोणत्याही अथवा सर्व दरपत्रके नाकारण्याचे अधिकार परिवहन आयुक्त कार्यालय, मुंबई यांनी राखून ठेवले आहे.

(आर. टी. गिते)
सह परिवहन आयुक्त (निरीक्षण)
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

Scanned with OKEN Scanner

# परिशिष्ट - अ

| | | |
|---|---|---|
| (१) | संस्थेचे पुर्ण नाव | |
| (२) | संस्थेचा पुर्ण पत्ता | |
| ३) | दुरध्वनी क्रमांक / मोबाईल क्रमांक | |
| ४) | PAN / TIN No. | |
| ५) | GST No.<br>(सुट असल्यास त्याबाबतचे प्रमाणपत्र जोडावे) | |
| ६) | सदरची संस्था शासनामार्फत काळ्या यादीत टाकलेली नसावी.<br>(याबाबतचे प्रतिज्ञापत्र सोबत जोडावे) | |
| ७) | जलशुध्दीकरण यंत्र (WATER PURIFIER) देखभाल दुरुस्ती कामाचा कमीत कमी २ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक राहील.<br>(याबाबतचे दस्तऐवज जोडावे.) | |

दिनांक :-

ठिकाण :-

सेवापुरवठादाराची स्वाक्षरी :- ----------------------------

सेवापुरवठादाराचे नाव :- ---------------------------------

सेवापुरवठादाराच्या कार्यालयाच्या पत्ता :- ----------------

शिक्का

Scanned with OKEN Scanner

# परिशिष्ट - ब
## प्रतिज्ञापत्र (Undertaking)

१. मी / आम्ही खाली सही करणार याव्दारे प्रमाणित करतो की, प्रसिध्दीपत्रकात नमूद केलेल्या सर्व अटी व शर्ती मी / आम्ही वाचल्या असून त्यांचे पालन करण्याचे याव्दारे वचन देत आहोत.

२. आमच्या संस्थेमार्फत कराराच्या अटीं व शर्तींचे उल्लंघन झाल्यास आम्ही जमा केलेली सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्याचे अधिकार याव्दारे मी/ आम्ही परिवहन आयुक्त कार्यालयास देत आहोत.

३. मी / आम्ही परिवहन आयुक्त कार्यालय, मुंबई कार्यालयातील ३ जलशुध्दीकरण यंत्रांच्या (WATER PURIFIER) (HI TECH RO १०० LPH) सर्वसमावेशक देखभाल दुरुस्तीचे कामकाज कंत्राटी पध्दतीने करण्यासाठी मागवण्यात येणाऱ्या प्रसिध्दीपत्रकात नमूद केलेल्या सर्व अटी व शर्ती मला/ आम्हाला मान्य असून त्याप्रमाणे काम करण्यास तयार आहे.

४. वर नमूद केलेली माहिती सत्य आहे.

दिनांक :-

**सेवापुरवठादाराची स्वाक्षरी :- -----------------------------**

**सेवापुरवठादाराचे नाव :- ---------------------------------**

**सेवापुरवठादाराच्या कार्यालयाच्या पत्ता :- ---------------**

**शिक्का**

Scanned with OKEN Scanner

# परिशिष्ट - क

## जलशुध्दीकरण यंत्रांच्या (WATER PURIFIER) सर्वसमावेशक वार्षिक देखभाल दुरुस्ती करारासाठी किंमत बोली

| वस्तूचा तपशील (Product) | रचना (Make) | नमुना(Model) | उध्दृत प्रति युनिट दर (Per Unit rate quoted) | संख्या (Quantity) | एकुण उध्दृत रक्कम (Total Qouted Amount) |
|---|---|---|---|---|---|
| REVERSE OSMOSIS (RO) WATER PURIFIER | Hi-Tech | १०० LPH | | ३ | |
| ३ वॉटर प्युरिफायरच्या सर्वसमावेशक वार्षिक देखभाल दुरुस्ती करारासाठी त्रैमासिक दर :- | | | | | |
| लागणारे कर :- | | | | | |
| एकुण वार्षिक दराची रक्कम (सर्व करांसह) :- | | | | | |

| | |
|---|---|
| सेवापुरवठादार अतिरिक्त भागांकरिता विनाशुल्क सेवा पुरविण्यास इच्छित असल्यास त्याबाबतचा तपशील (अटी व शर्ती मध्ये नमूद करण्यात आलेल्या भागांव्यतिरिक्त) | |

दिनांक :-

ठिकाण :-

सेवापुरवठादाराची स्वाक्षरी :- ----------------------------

सेवापुरवठादाराचे नाव :- ----------------------------------

सेवापुरवठादाराच्या कार्यालयाच्या पत्ता :- ----------------

शिक्का

Scanned with OKEN Scanner